## आंतरराज्यीय ...

# राजस्थानातही नोंद आहेत गुन्हे

बहादूरविरुद्ध राजस्थानमध्ये एटीएम चोरी करण्याचे 10 आणि इतर चोरीचे 4 गुन्हे नोंद आहेत. या टोळीसाठी वाहन चोरी करण्याचे काम गोपालराम करतो. त्याच्याविरुद्ध 8 गुन्हे नोंद आहेत. श्रीनिवासविरुद्ध एटीएम मशीन चोरीचे 9 आणि इतर चोरीचे 4 गुन्हे नोंद आहेत. ही कारवाई पोनि अनिल जिट्टावार यांच्या नेतृत्वात सपोनि जितेंद्र वैरागडे, सपोउपनि सचिन मत्ते, नरेंद्र गौरखेडे, जावेद शेख, सफौ लक्ष्मीप्रसाद दुबे, बाबा केचे, पोहवा चंद्रशेखर गडेकर, गजेंद्र चौधरी, मदन असतकर, निलेश बर्वे, सूरज परमार, महेश जाधव, राजेंद्र सनोडिया, नाना राऊत, सुनील मिश्रा, दुर्गाप्रसाद पारडे, आदींनी केली.

34% 6:44 am
Lite www.ehitavada.com/index.php?edition=N

Pawar will chair State-level district annual plan meeting at Divisional Commissionerate in Civil Lines. After the meeting, he will leave for Mumbai by aircraft at 8.15 pm, states an official press release.

## Eknath Shinde in city today



EKNATH Shinde, Minister for Urban Development and Public Works (Public Enterprises), will be in the city on Tuesday. He will arrive at Dr Babasaheb Ambedkar International Airport at 9 am. Later, he will proceed to Ravi Bhavan. At 10.15 am, Shinde will grace the inauguration of Nagpur Metro Aqua Line route from Lokmanya Nagar to Sitabuldi Inter-change station. In the afternoon, he will attend the Gadchiroli district annual plan meeting at Divisional Commissionerate in Civil Lines. After the meeting, at 6 pm, he will fly back to Mumbai.

**WEATHER**

| TEMPERATURE | MAX. | MIN. |
|---|---|---|
| Celsius | 32.2 | 11.5 |
| Dep from normal | 01 | -2 |
| Fahrenheit | 89.9 | 52.7 |
| Relative humidity | 89% | 54% |
| Sunset on Tuesday | 1758 hrs | |
| Sunrise on Wednesday | 0650 hrs | |
| Air Quality Index | 80 (2200 hrs) | |

# Rural police bust gang of ATM robbers in filmy style



SP (Rural) Rakesh Ola and LCB staff with arrested robbers.

- The gang was involved in six ATM robberies in the districts within five months

■ **Staff Reporter**

FOUR notorious robbers from Rajasthan were nabbed in filmy style by the Local Crime Branch (LCB) of Rural police after a hot chase in the wee hours of Sunday. The gang was involved in 10 offences including six ATM robberies reported in Nagpur Rural, City and Wardha district in last five months, said police.

On January 24, a Mahindra Pick up vehicle was stolen by the robbers from Dahegaon near Khaparkheda area. The cops suspected involvement of the gang and intensified patrolling the area.

The stolen vehicle crossed the police jeep near Patansaongi on Sunday at 3 am. The cops grew suspicious on the vehicle and what followed was a hot pursuit that lasted nearly 20 minutes. During the chase, the goons threw nails and stones on the police jeep. One of the accused was

the police would take it as a gun. However, the police continued the chase.

Soon after, accused Bahadur Bawari jumped from the vehicle and tried to flee in the jungle. However, he was arrested by the police. Other robbers left the vehicle abandoned in a farm near Kalambi village and fled the spot.

The police have seized the vehicle and alerted local police stations. Two team of LCB reached Nagpur Railway Station and Bus Stand in plain clothes. When the three robbers deboarded from an auto-ricksahw at Nagpur Railway Station, the cops immediately arrested them and bundled in police jeep.

Arrested accused have been identified as Bahadur Pehladaram Bawari (30), Gopalram Tejaram Bawari (23), Tufan Hanumanram Bawari (20), all residents of Nagaur district of Rajasthan, and Shriniwas Bantalal Bawari (26), a resident of Ajmer district of Rajasthan.

Superintendent of Police (SP) Rakesh Ola said that the robbers were living at rented accommodation in Wadi area of Nagpur and at Wardha town. Before

# Centre ma

■ **Staff Reporter**

IN ADDITION to stan ditions imposed in th for approvals accord Forest Conservation Ac ing companies in the co have to undertake 're-g mined out areas. Government has issu tives in this regard to the Chief Conservator of all the States.

Forest Conservation under Union Min Environment, Forest ar Change has issued the on January 14, 2020, w ture of Sandeep Sharma Inspector General of F per the directive, the condition is stipulated, ing lease holder shall, a ing mining operation take re-grassing the m and any other areas w

# Age n

■ **Staff Reporter**

AGE is just a numb is young at heart. Th has been indicated by siasts, all from differ ed professions, in su completing their rid cles from Pune to Nag six days.

To count the physi are above 60 years of a and a woman. The cyclists from Pune, th using this mode of tra regular exercise, dec ally to visit Nagpur. M retired from their jo served the profession period, joined the 'tri with the message healthy life by regul

राहत होते. २१ जानेवारीला मैत्रिण गावी गेली तर भाऊसुद्धा

आरडाओरड केली. बाजूला राहणारे कर्मचारी धावले.

मोदी यांनी व्हीडिओ लिंकद्वारे उद्घाटन केले होते हे विशेष.

कि.मी. लांबीच्या मार्गाचे उद्घाटन मंगळवारी होणार आहे. या मार्गावर

स्टेशन प्रवासी सेवेसाठी सज्ज आहेत. अंबाझरी तलाव, गांधी

असे आवाहन महा मेट्रोतर्फे करण्यात येत आहे.

### १० गुन्ह्यांची कुबली, ग्रामीण एलसीबीचे यश

# राजस्थानातील एटीएम फोडणारे गजाआड

**नागपूर ■ प्रतिनिधी**

जिल्ह्यात दहा एटीएम मशीन फोडून चोरी करणाऱ्या राजस्थान येथील टोळीच्या मुसक्या आवळण्यात ग्रामीण पोलिसांना यश आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी चौघांना अटक केली. तर एका आरोपी फरार आहे. सर्वांविरुद्ध अनेक गुन्हे दाखल आहेत.



बहादूर पेहलदाराम बावरी (३०), गोपालराम तेजाराम बावरी (२३), तुफान हनुमानराम बावरी (२०) तिन्ही रा. नागोर आणि श्रीनिवास बंतालाल बावरी (२६) रा. पुष्कर अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. तर त्यांचा साथीदार भंवरलाल चौधरी (३०) रा. नागोर हा फरार आहे. सर्व आरोपी राजस्थानच्या नागोर व पुष्कर परिसरातील वेगवेगळया भागाचे रहिवासी आहे. बहादूर याच्याविरुद्ध राजस्थानमध्ये १० एटीएम मशीन चोरीचे व चार इतर गुन्हे दाखल आहेत. गोपालरावविरुद्ध वाहनचोरीचे आठ गुन्हे दाखल आहेत. तर श्रीनिवास याच्याविरुद्ध एटीएममशीन मशीन चोरीचे नऊ गुन्हे व इतर चार गुन्हे दाखल आहेत, अशी माहिती ग्रामीण पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी पत्रकार परिषदेत दिली. एटीएम मशीन फोडण्यापूर्वी ते परिसरातील मालवाहू कॅम्पर नावाचे वाहन चोरी करीत होते. त्यांनी प्रथम खापरखेडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दहेगाव येथून ११ ऑक्टोबर २०१९ रोजी एक मालवाहू वाहन चोरले व त्याच्या तीन दिवसांनी काटोलमध्ये बँक ऑफ महाराष्ट्राचे एटीएमच लंपास केले. त्या मशीनमध्ये १६ लाख रुपये होते. यातील तिघा आरोपींना रेल्वे स्थानकाजवळून अटक करण्यात आली. आरोपींचे वाडी व सेवाग्राम येथे भाड्याच्या खोल्या असून येथेच एटीएम मशीन नेऊन फोडायचे. आतापर्यंत त्यांनी खापरखेडा, काटोल, कोंढाळी, सावनेर, वाडी, सेवाग्राम आणि सेलू येथील दहा ठिकाणी चोरी केली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अनिल जिट्टावार यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक निरीक्षक जितेंद्र वैरागडे, सचिन मत्ते, नरेंद्र गौरखेडे, जावेद शेख, लक्ष्मीप्रसाद दुबे, बाबा केचे, चंद्रशेखर घडेकर, गजेंद्र चौधरी, मदन आसतकर, नीलेश बर्वे, सूरज परमार आदींनी तपास केला.

### एटीएम परिसरात रचला सापळा

ग्रामीण भागात पिक-अप वाहन चोरी गेल्यानंतर परिसरात एटीएमची चोरी व्हायची, असे पोलिसांच्या लक्षात आले. गेल्या २४ जानेवारीला आरोपींनी खापरखेडा परिसरातील पिपळा शिवारातून वैभव कृषी सेवा केंद्राचे एमएच-४०, वाय-३५४४ क्रमांकाचे एक पिक-अप वाहन चोरीला गेले. पोलिसांनी सर्व एटीएम परिसरात रात्रंदिवस सापळा रचला. त्यावेळी पाटणसावंगी परिसरात संबंधित वाहन २५ जानेवारीच्या पहाटे ३ वाजता दिसले. या वाहनाचा जवळपास २० ते २२ किमीपर्यंत पाठलाग केल्यानंतर मुख्य आरोपी बहादूरने कळंबी गावाजवळ धावत्या वाहनातून उडी घेताच सापळ्यात अडकला.

## ATM लंपास करणारी

# आंतरराज्यीय टोळी गवसली

## ग्रामीण गुन्हे शाखेची कारवाई



**नागपूर.** ग्रामीण भागात एटीएम चोरी करून दहशत पसरविणाऱ्या आंतरराज्यीय टोळीला अखेर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली. ही टोळी एटीएममधून पैसे नाही तर संपूर्ण एटीएमच चोरी करीत होते. अत्यंत शिताफीने ग्रामीण पोलिस अधीक्षक राकेश ओला यांनी एलसीबीचे जाळे पसरवले आणि या जाळ्यात आरोपी अडकले. अटकेतील अरोपींमध्ये नागोर, राजस्थान निवासी बहादूर पहलादराम बावरी (30), गोपालराम तेजाराम बावरी (23), तुफार हनुमानराम बावरी (20) आणि श्रीनिवास बंतालाल बावरी (26) यांचा समावेश आहे. पोलिस अधीक्षक ओला यांनी सांगितले की, गत 3 महिन्यांपासून ही टोळी नागपूर आणि वर्धा जिल्ह्यात सक्रिय होती. ऑक्टोबर महिन्यापासून आतापर्यंत या टोळीने अनेक ठिकाणचे एटीएम उचलून नेले होते. या घटनांमुळे ग्रामीण पोलिसांची डोकेदुखी वाढली होती.

### 25 कि.मी.पर्यंत केला पाठलाग

ओला यांनी या टोळीच्या काम करण्याच्या पद्धतीवर लक्ष केंद्रित केले. जिल्ह्यातून पिकअप वाहन चोरी झाल्यानंतर एटीएम चोरी होत होते. यावरून स्पष्ट झाले होते की, ही टोळी आधी वाहनाची चोरी करते आणि मग चोरीच्या वाहनाचा उपयोग करून एटीएम मशीनची चोरी करते. 24 जानेवारीला रात्री खापरखेड्याच्या दहेगाव येथील वैभव कृषी केंद्रातून एमएच-40/वाय-3544 क्रमांकाचे पिकअप वाहन चोरी झाले. पोलिसांनी अंदाज लावला की, जिल्ह्यात कुठे ना कुठे एटीएम चोरीची घटना होऊ शकते. यामुळे एलसीबीचे 3 पथक वेगवेगळ्या दिशांनी गस्तीवर निघाले. खापा टी-पॉईंटवरून पाटणसावंगीकडे वरील क्रमांकाचे वाहन जाताना दिसले. पोलिसांनी पाटणसावंगी, सावरमेंढा, माहुरझरी आणि फेटरी मार्गापर्यंत वाहनाचा पाठलाग केला. कळमेश्वरच्या कळंबी गावाजवळ एका आरोपीने पोलिसांच्या वाहनावर दगडफेक सुरू केली. रस्त्यावर खिळे आणि आरी फेकून टायर पंक्चर करण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिस वाहन चालक अमोल कुथे यांनी मोठ्या हिमतीने पाठलाग सुरू ठेवला.

## वाहनातून उडी घेत पळून जाण्याचा प्रयत्न

अखेर बहादूरने वाहनातून उडी घेतली आणि पळ काढला. पोलिसांनी त्याला पकडले आणि वाहनाचा पाठलाग सुरू ठेवला, मात्र कळंबी गावात आरोपी वाहन सोडून पसार झाले. बहादूर सापडल्याने ही माहिती मिळाली की, आरोपी राजस्थानचे आहेत आणि शहराबाहेर पळून जाण्याचा प्रयत्न करतील. यामुळे बसस्थानक आणि रेल्वेस्थानकावर नजर ठेवण्यात आली. रविवारी पोलिसांनी रेल्वेस्थानकावर इतर तिघांना ऑटोतून उतरताना अटक केली. आतापर्यंत जिल्ह्यातील सर्व 10 एटीएम चोरीचा गुन्हा आरोपींनी कबूल केला. यावेळी आरोपी सावनेरमध्ये देना बँकेचे एटीएम चोरी करणार होते. आरोपींसाठी रेकीचे काम करणारा भंवरलाल चौधरी सध्या पोलिसांना सापडलेला नाही. आरोपींनी वाडी हद्दीत एक खोली भाड्याने घेतली होती. या खोलीतच ईलेक्ट्रिक कटर मशीनने एटीएम कापण्यात येत होते.

उर्वरित पान 6 वर